# प्रकरण पाचवे

# 'व्यंकटेश माडगूळकरांची निवेदनशैली'

**प्रास्ताविकः**

मागील प्रकरणात व्यंकटेश माडगूळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखा व भाषाशैली याचा विचार स्पष्ट केला. प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर आपल्या कथात्मक साहित्याला एका वेगळया मुक्कामापर्यंत घेऊन जाण्यास यशस्वी झाले ते त्यांच्या निवेदनशैलीमुळे. या निवेदनशैलीचा विचार या प्रकरणात 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसें', 'गावाकडच्या गोष्टी' च्या अनुषगांने करावयाचा आहे.

प्रादेशिक या संकल्पनेची यथायोग्य ओळख मराठी वाचकाला करून दिली, ती माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीने. म्हणूनच 'बनगरवाडी' ही कादंबरी मराठी साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात विशेष चर्चिली गेल्याचे दिसते. बनगरवाडीतील घटना, प्रसंग व बोलीभाषा यांची सांगड माडगूळकरांनी प्रत्ययकारी रीतीने साधल्यानेच त्यांच्या निवेदनाला वेगळेपणा लाभलेला आहे. 'बनगरवाडी' या कादंबरीत माडगूळकरांनी प्रथमपुरूषी निवेदन पध्दतीचा वापर केल्याने बनगरवाडीचा आशय-विषय वाचकाप्रर्यंत सहजासहजी पोहचल्याचे दिसते.

मराठी कथा स्वप्न रंजनातून बाहेर पडून वास्तवतेकडे धाव घेऊ लागली. ग्रामीण प्रदेश ग्रामीण माणसांचे वेध तिला लागले. मराठी नवकथेच्या काळापासून मराठी कथेला गावाकडच्या मातीचा टिळा

लावणारे एक शिलेदार म्हणून माडगूळकरांचे नाव घेता येईल. व्यंकटेश माडगूळकर एक अव्वल दर्जाचे लेखक आहेत. म्हणूनच गो. मा.पवार म्हणतात, 'व्यंकटेश माडगूळकर हे अव्वल दर्जाचे ग्रामीण लेखक ठरतात. कारण त्यांच्या लेखनीतून अस्सल ग्रामीण संवेदनशिलतेचा प्रत्यय येतो. त्यांची 'सर्व्हीस मोटार'सारखी कथा असो की माणदेशी माणसाचे एखादे व्यक्तिचित्र असो, संपूर्ण ग्रामीण जीवनपध्दती, तिथली संस्कृती, परंपरा आणि त्यामध्ये घडलेले मन याचा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे."[१] माडगूळकरांनी कथातून प्रथमपुरूषी त्याचबरोबर तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा अवलंब केल्याचे दिसून येते. माडगूळकरांच्या निवेदनशैलीचा विचार करण्यापूर्वी निवेदनशैलीचे प्रकार पाहून त्यांच्या निवेदनशैलीचा विस्तृत विचार करता येईल.

## कथात्मक साहित्यातील निवेदनशैलीः

कथात्मक साहित्यकृतीतील कोणते तरी एक पात्र सारी हकिकत सांगते किंवा लेखक त्रयस्थाची भूमिका घेऊन सर्व प्रसंग स्वतः वर्णन करून सांगता, त्याला निवेदन असे म्हणतात. निवेदनशैलीचे काही प्रकार पुढील प्रमाणे-

### निवेदनशैलीचे प्रकारः

१) प्रथमपुरुषी निवेदनपध्दती

२) तृतीयपुरुषी निवेदनपध्दती

३) पत्रात्मक निवेदनपध्दती

४) दैनंदिनी स्वरूपातील निवेदनपध्दती

## १) प्रथमपुरुषी निवेदनपध्दतीः

प्रथमपुरुषी निवेदनपध्दतीत कोणते तरी एखादे पात्र स्वतःहून सर्व हाकिकत सांगत असते. नायक किंवा नायिका यांच्यापैकी कोणाला तरी केंद्रस्थानी कल्पून कथा किंवा कादंबरीतील लहानसहान प्रसंगाची गुंफण केलेली असते. या निवेदनपध्दतीद्वारा लेखक पात्रांशी तादात्म्य पावत असतो. लेखक पात्रांशी कशा प्रकारे समरस होतो, आणि आपल्या अनुभवाचे चित्रण कसे रंगावीत असतो, याचे विवेचन 'मराठी कांदंबरी तंत्र आणि विकास' या ग्रथांत पुढीलप्रमाणे येते-''कथालेखक कथेतील एखादया पात्राशी समरस झाला म्हणजे त्याला अनेकमुखी व व्यापक अशी सर्वव्यापी दृष्टी ठेवणे आवश्यक न राहून एका विवक्षित दृष्टिकोणाने जगाकडे पाहाणे व जगताचे चित्र रंगविणे सहज शक्य होते व लेखनातही एक त-हेचा जिव्हाळा उत्पन्न होतो''.[२] प्रथमपुरुषी निवेदनपध्दतीलाच आत्मकथनपर किंवा पात्रमुखी निवेदनपध्दती असेही म्हणतात.

## २) तृतीयपुरुषी निवेदनपध्दतीः

लेखक त्रयस्थाची भूमिका होऊन सर्व प्रसंग स्वतः वर्णन करून सांगतो. त्या पध्दतीला तृतीय निवेदन पध्दती म्हणता येईल. या पध्दतीचाच वापर बहुतेक प्रथितयश कथा, कादंबरीकारांनी केलेला दिसतो. या निवेदनपध्दतीविषयी सांगत असताना बालशंकर देशपांडे म्हणतात, ''प्रथमपुरुषी निवेदनात एकसुरीपणा उत्पन्न होण्याचा धोका असतो. तो त्रयस्थाच्या भूमिकेवरून केलेल्या निवेदनाने टाळता येतो आणि वाचकांच्या वैचित्र्याची भूकही तृप्त केल्याचे श्रेय लेखकाला

मिळविता येते''.[३] तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीमुळे कथनातील कोणत्याही पात्रांच्या गुणदोषाची जाणीव होते असे म्हणता येईल.

## ३) पत्रात्मक निवेदनपध्दती:

लेखक निरानिराळी पत्रे लिहीत असताना स्वतःकडे निरनिराळया भूमिका घेऊन तादात्म्य कल्पित असल्यामुळे कोणत्याही प्रश्नांचा विचार करणे त्यास सहज शक्य होत असल्याने तो पत्रबध्द निवेदनात्मक पध्दतीचा वापर करतो. त्याचबरोबर कोणत्याही वादग्रस्त प्रश्नाच्या अनेक बाजू आपल्या लिखाणात मांडावयाच्या असल्यास तंत्रदृष्टया पत्रात्मक निवेदनपध्दत हे एक सोयीस्कर माध्यम आहे. प्रा. वा.म. जोशी यांची 'इंदुकाळे व सरला भाळे' ही कांदबरी या पध्दतीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेच पु.शि.रेगे यांनी 'सावित्री' या कादंबरीतही पत्रात्मक निवेदनाचे साहाय्य घेतले आहे.

## ४) दैनंदिनी स्वरूपातील निवेदनपध्दती:

या निवेदनपध्दतीत लेखक एका पात्राशी एकात्म्य व अनेक पात्राशी तादात्म्य साधतो असे दोन्ही प्रकार संभवतात. अशा निवेदनात्मक पध्दतीचा महत्त्वाचा गुणविशेष म्हणजे या निवेदनात्मक पध्दतीत एकत-हेचा उठावदारपणा जास्त असतो. दैनंदिनीमध्ये अनेक संग्रहामुळे किंवा घटनांमुळे मनावर झालेले आघात ते पात्र त्या क्षणीच नोंदवून ठेवीत असल्यामुळे त्या प्रकटीकरणाला एक प्रकारची धार येते. अशा प्रकारच्या लेखनाचा आवाका मर्यादित असतो व सर्वच घटकांचा परिपाठ या लेखनात होऊ शकत नाही. हा या निवेदनपध्दतीचा एक दोषही सांगता येईल.

दैनंदिनी स्वरूपातील निवेदनपध्दतीचे एक उदाहरण म्हणून ना.सी. फडके यांच्या 'काश्मिरी गुलाब' या कादंबरीचे नाव घेता येईल. या कादंबरीच्या कथानकाची पूर्वतयारी करण्याकरिता अमलाकांत व गुलाब यांच्या दैनंदिनीतील उतारे देऊन या पध्दतीचा लेखकाने मोठया चातुर्याने उपयोग केला आहे. तसेच प्रसिध्द कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या 'कोसला' या कादंबरीच्या उत्तरार्धात दैनंदिनीचा प्रत्ययकारीतीने उपयोग केला आहे.

अशा प्रकारे निवेदनशैलीचे काही प्रमुख प्रकार असलेले दिसून येतात. या प्रकारात अनेक लेखकांनी कथा व कादंब-याचे लेखन केलेले दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर यांच्या निवेदनशैलीचा विस्तृत विचार यातील काही प्रकारांच्या आधाराने करता येईल.

## व्यंकटेश माडगूळकरांची निवेदनशैलीः

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या वैशिष्टयपूर्ण निवेदनशैलीद्वारे आपल्या कथात्मक साहित्याला अभिजात पातळीवर नेऊन ठेवले आहे. व्यंकटेश माडगूळकरांची कथा म्हणजे नवकथेचा फुलोराच म्हणावे लागेल. माणदेशाशी त्यांची जोडली गेलेली नाळ त्यांच्या कथेत जींवतपणा व जातीवंतपणा आणण्यास मूलभूत आधार ठरली. रा.गो. चवरे व्यंकटेश माडगूळकरांच्या शैलीविषयी म्हणतात, ''व्यंकटेश माडगूळकरांनी प्रादेशिक जीवन पारंपरिकतेहून भिन्न पध्दतीने त्यांच्या नक्षिसह अधोरेखित करताना त्यांच्या बोली, अभिरुची, राग, लोभ यांच्या वास्तवस्पर्शी स्थलचित्रणात मूलभूत नावीन्य ओतले. असंबध्देतही एक सुसंबध्दता नांदत असल्याचा रसोत्कट रुचिर प्रत्यय आणून दिला. ग्रामीण बोली व ग्रामीण प्रतीके यांना आगळी प्रतिष्ठा

प्राप्त करून दिली''.[४] व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या स्वतःच्या अशा खास साध्या, सरळ व अकृत्रिम निवेदनशैलीत 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' यांचा आशय विषय रंगविला आहे. माणदेशातील एखादा खेडूतच आपली कथा सांगतो की काय असेच वाचकाला वाटून रहाते. माडगूळकरांच्या एकूणच निवेदनशैलीचा विस्तृत विचार खालीलप्रमाणे करता येईल.

'बनगरवाडी' ही व्यंकटेश माडगूळकरांची प्रादेशिक जीवनाचे प्रभावी चित्रण करणारी विशेष उल्लेखनीय अशी कादंबरी आहे. माडगूळकरांनी या कादंबरीत प्रथमपुरुषी निवेदनपध्दतीचा वापर करून आशयाला प्रभावीपणे आविष्कृत केले आहे. त्यांच्या या शैलीचे गुण सांगताना म.द.हातकणंगलेकर म्हणतात, ''Style is the man शैली हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होय Good style is not the dress but the skin of the man आदर्श शैलीही विषयाच्या त्वचेसारखी अंगभूत असावी या माडगूळकरांच्या शैलीत हे दोन्ही गुण सहजपणे वावरतात''.[५]

प्रस्तुत प्रकरणात 'बनगरवाडी' तसेच 'माणदेशी माणसें' आणि 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातील निवेदनपध्दतीचा विचार, निसर्ग चित्रण, परिसर चित्रण, सामाजिक चित्रण, व्यक्तिचित्रण, प्रसंग चित्रणाच्या अनुषंगाने करावयाचा आहे.

## माडगूळकरांच्या निवदेनशैलीतील निसर्गचित्रणः

माडगूळकरांनी 'बनगरवाडी' या दुष्काळसदृश्य गावचा, तेथील परिसराचा व मानवी जीवनाचा परिचय करून देण्यासाठी राजाराम

विठ्ठल सौंदणीकर या पोरसवदा शिक्षकाची निवेदक म्हणून नेमणूक केली आहे. म्हणून बनगरवाडीतील निवेदन प्रथमपुरुषी निवेदन ठरते. भल्या पहाटे मास्तर बनगरवाडीला निघालेला आहे. या पहाटेच्या निसर्ग चित्रणावर माडगूळकर निवेदन करतात. ‘‘अद्याप सर्वत्र काळोख भरून राहिला होता. चांदण्या चमकत होत्या. समोर वळसे मारीत चाललेली गाडीवाट तेवढी फिक्कट अशी दिसत होती. रातकिडे किरकिरत होते. माळावरून गार झोंबरे वारे वाहू लागले. चांदण्याचे तेज कमी झाले. धड चांदण्याचा उजेड नाही धड उजाडलेही नाही. बाभळी तरवडासारख्या झुडपांचा ओळखू येणारा वास जाणवू लागला. रातकिडयांचे गाणे थांबले, झोपून जाग्या झालेल्या, कावळयाची जड कावकाव ऐकू आली. तांबडा पिवळा सूर्य माळाआडून वर आला. हिरवट प्रकाशाला पिवळी झळाळी आली. बोरींच्या झुडपात बसून राहिलेल्या सातबाया जाग्या झाल्या शेपटी नाचवून कलकलू लागल्या. झुडपात पिसे फुलवून बसलेले होले पायावर उभे राहून आवाज टाकू लागले, कावळे भरा-या घेऊ लागले, मुंग्या तुरतुरल्या, टोळ उडया हाणू लागले, सरडे सरसरले, मुरमु-याच्या बुंध्यावर बसून राहिलेले हिरव्या झगझगीत रंगाचे भुंगे मुरमुरीचे तुरट पाने खाऊ लागले. माळावरच्या बिळातून घोरपडीनी मुंडकी बाहेर काढली, झाडे सोडून होले रस्त्यावर आले आणि डौलदार माना हलवित धुळीत पडलेले गवताचे बी टिपू लागले. सपाट झालेल्या धूळीवर त्यांच्या पायाचे ठसे नक्षिकाम केल्यासारखे उठू लागले,’’(बनगरवाडी पृ.१.२) अशा प्रकारे माडगूळकर पहाटेच्या निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण करून निवेदन करतात.

माडगूळकर निसर्गचित्रणासंदर्भात निवेदन करताना बदलत्या ऋतूनुसार निसर्गात होणा-या बदलाचा आपल्या निवेदनाच्या अनुषंगाने आढावा घेतात-''उन्हाळा संपला पावसाळा आला. इंद्रगोप दिसू लागले आणि मृग निघाला, आभाळ झाकोळून आले. स्वच्छ ऊन नाहीसे झाले, वारे सुटले झाडेझुडे गदगद् हालू लागली. धूळमाती चौफेर उडू लागली, सडा-सडा धारा आल्या, मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोडपू लागला. तावलेल्या जमिनीतून वाफा निघाल्या, चिखल झाला आणि मग तोही वाहून गेला. पोपटी रंगाच्या गवताने जमिनीतून डोकी वर काढली, अंगणात, माळावर, छपरावर जिथे उगवू नये तेथे गवत उगवू लागले. सर्वत्र झगझगीत पोपटी रंग दिसू लागला. लहान अळीसारखे पिवळया रंगाचे किडे नाहिसे झाले. विटकरी रंगाचे लांबट वाणी एकमेकांच्या पाठुंगळी बसून अनेक पायवर चालू लागले. कोणाच्याही दृष्टीला न पडण्याच्या खबरदारी घेऊन चित्तर उंच स्वरात ओरडू लागले.''(बनगरवाडी पृ.३५,३६) अशा प्रकारे माडगूळकरांनी पावसाळयातील बनगरवाडीतील निसर्गाचे प्रत्यक्ष दर्शनी चित्रण आपल्या निवेदनशैलीतून घडविले आहे.

माडगूळकर निसर्गाच्या विविधांगावर निवेदन करत असतानाच पावसाअभावी आवर्षणग्रस्त झालेल्या निसर्गाचेही निवेदन करतात. ते असे ''नक्षत्रामागून नक्षत्रे गेली आणि 'बनगरवाडी' वर पाण्याचा टिपूस पडला नाही. झाडे झुडपे वाळून कोळ झाली. फूफाटा फार झाला चक्रीवादळे होऊ लागली. विहिरीतील पाणी आटले. वाडीचा हेळ आटला. संध्याकाळच्या सुमाराला चिमणीला प्यायलासुध्दा पाणी दिसेनासे झाले. छपराचे जुने कुडाचे काड उपसून लोक जनावरापुढे टाकू लागले. भुकेने वखवखलेले रानातले उंदीर गावात आले.

लोकांच्या तोंडावरची कळा नाहीशी झाली. त्यांच्या डोळयात भूक दिसू लागली. खाण्याची अभाळ झाल्यामुळे मेंढरे रोडावली आणि अशक्त झालेल्या त्यांच्या शरीरांना नाना रोग जडू लागले. मेंढरे मरू लागली. सकाळ संध्याकाळ हजारोंनी बाहेर पडणारी आणि पुन्हा वाडीत परत येणारी मेंढरे, तरुण मेंढके गेले आणि वाडी भकास झाली.''(बनगरवाडी पृ.१२०ते१२७) अशा प्रकारे माडगूळकरांनी दुष्काळामुळे बनगरवाडीच्या निसर्गाला लागलेली आवकळा व त्यातून बनगरवाडीवर निसर्गाची झालेली अवकृपा यावर प्रत्ययकारी निवेदन केले आहे.

माडगूळकरांनी कादंबरीप्रमाणेच आपल्या 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातूनही निसर्ग चित्रणावर प्रत्ययकारी निवेदन केलेले दिसून येते. 'माणदेशी माणसें' या कथासंग्रहातील धर्मा रामोशी या कथेतील रामोशी या जमातीत जीवन जगणारा धर्मा आयुष्याच्या उतार वयात तो कशा प्रकारे जीवन व्यतीत करतो त्याचे हे कारुण्यमय जीवन प्रभावीपणे रेखाटण्याकरिता माडगूळकर निसर्गनिवेदन करतात. ''सांज व्हावी ऊन सावली परस्परात मिसळून विसावावी गुरे वासरे रानातून घरी परतावी घरातून सांजवाती उजळाव्यात अशा कातरवेली धोतराचा सोगा खांद्यावर टाकून अंगणातल्या अंगणात शतपावली द्यालावी, कधी उघडयावर टाकलेल्या खाटल्यावर पडून हळूहळू उजणा-या अभाळाकडे पाहावं कधी तुळशीवृंदावनाच्या कट्टयावर बसावं, बाहेरच्या पायरीशी काठी वाजावी आणि आवाज यावा 'दळण आणा जी आक्का''(पृ.३) या निसर्गावर्णनाबरोबरच एका थकल्या भागल्या जीवाची करुण व्यथाही प्रकट होते.

तर 'गावाकडच्या गोष्टी' मधील 'मारुतराया' या कथेत गावात आलेला वानर पाहण्यासाठी झालेली गर्दी या प्रसंगावर माडगूळकर निवेदन करतात ते असे 'तारेवर चिमण्या बसाव्यात तशी ती पोरं पायरीवर दाटीवाटीनं बसली आणि आपल्या मिचमिच्या डोळयांनी नव्या सूर्याचा चमकदार प्रकाश बघू लागली. तेव्हा मारुतीच्या शिखरावर बसलेला तो नवखा प्राणी त्यांनी पाहिला आणि आनंद, आश्चर्य, भीती यामुळे त्यांची मने उडू लागली'(पृ.५८) तर 'न्याय' या कथेत पहाटेच्या समयी होणा-या निसर्ग दर्शनावर माडगूळकर निवेदन करतात. 'चांदणी उगवली गारवा झोंबू लागला. दिशा उजळल्या होत्या रानचिमण्या अंगावरचं पिसं चोचिनं उकरीत होत्या. जोंधळयाची ताटं धुकं पांघरून उभी होती. त्यांच्या डोक्यावरची कणसं गारठून आकसली होती'.(पृ.१०४) अशा प्रकारे माडगूळकरांच्या कथातून निसर्गचित्रणावरील निवेदन येताना दिसते. आपल्या या निवेदनाशैली विषयी माडगूळकर म्हणतात, ''पेळूतून सूत निघावे तसे निवेदन निघते. नेमके शब्द येतात. वाक्यांची लय साधते. सगळे कसे प्रवाही बनते, जीवंत बनते, ही लय साधते तेव्हा सुध्दा मन कसे डोलू लागते मनच नव्हे तर शरीरसुध्दा ती लय आपल्या रक्तामासाला जाणवते कारण हा जणू आपल्या आत्म्याचा उध्दार असतो''.[६]

## माडगूळकरांच्या निवेदनातील परिसराचे चित्रणः

एकूणच माडगूळकरांच्या लिखाणात माणदेशातील परिसराचे प्रत्ययकारी चित्रण झालेले आहे. या माणदेशातील परिसराला आपल्या निवेदन शैलीचा साज चढवून माडगूळकरांनी त्या परिसराचे वास्तवदर्शी चित्रण घडविले आहे.

'बनगरवाडी' या कादंबरीत बनगरवाडी व परिसरावर माडगूळकर निवेदन करतात 'आजूबाजूला सपाट मोकळा माळं बाजरीची तांबडी राने आणि मध्येच गबाळे पडावे तशी पडलेली तीस-पस्तीस घरे अशी बनगरवाडी होती. बहुतेक घरांच्या भिंती मातीच्या होत्या. हरएक घरापुढे लहानमोठे अंगण होते. सांडपाण्यावर वाढलेला लिंबारा, शेवगा होता. घराच्या मागच्या बाजूला मेंढरे कोंडण्यासाठी बाभळीच्या काटयांचे कुड घालून केलेले वाडे होते.

तर पुढे बनगरवाडीतील एकूण परिसराविषयी माडगूळकर निवेदन करतात 'पाहावे तिकडे उघडे माळं अगोदर भगभगीत असलेले हे माळं उन्हाळयामुळे अधिक भगभगीत दिसत होते. क्वचित कुठेतरी खोलगट भागात झाडाझुडपांचे हिरवे ठिपके होते. एरवी चोहीकडे दगडगोटयांनी भरलेले माळं नेपती बोराटीची बाभूळमुरटीची खुरटलेली झुडपे आणि दगडांनी उंचावलेली कुठे रूंद तर कुठे अरूंद अशी गाडीवाट'.(पृ.२)

बदलत्या ऋतूमानानुसार परिसरात होणा-या बदलावर माडगूळकर निवेदन करतात, 'कडक थंडी पडू लागली. रात्री सकाळी चगळचोथा जमवून लोक शेकाटा घेऊ लागले. निखळशंख ओढयाच्या पाण्यावर, विहिरीवर सकाळच्या प्रहरी वाफा दिसू लागल्या, श्रावणमासी पेरलेली ज्वारी बळावली काळया रानातून ज्वारीची धाटे गुडग्यामांडीला आली मधून टाकलेले करडयाचे पट्टे काटयाला आहे'. (पृ.६०,६१)

दुष्काळामुळे बनगरवाडीतील परिसरावर आलेल्या भकारपणावर माडगूळकर निवेदन करतात, ''लेकुरवाळया मेंढयाचा आवाज ऐकू येईनासा झाला आणि वाडी भकास झाली. झोपडयातून धूर निघेना,

शाळेपुढे सभा भरेना लेंडया-मुताचा उग्र वास येईना आणि वाडी निर्जीव झाली. हालती-बोलती होती ती स्तब्ध, गप्प झाली. एकवेळ पाणी पडले नाही आणि वाडी खलास झाली. बरेवाईट सगळे गेले शाळा तिथेच राहिली, तालिम तिथेच राहिली, घरे, झाडे जिथल्या तिथे राहिली आणि मंडळी निघून गेली.''(पृ.१२७)

अशा प्रकारे माडगूळकरांनी बनगरवाडीतील बदलत्या परिसरावर प्रत्ययकारी निवेदन केले आहे.

माडगूळकरांनी 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातून माणदेशातील परिसराला आपल्या निवेदनशैलीद्वारे आविष्कृत केले आहे. 'माणदेशी माणसें' या कथासंग्रहात वैराणमुलुखाच्या परिसर चित्रणावर माडगूळकर निवेदन करतात ''आजूबाजूला सारा बोडका माळ आहे. पाच मैलाच्या प्रवासात तहान लागली तर वाटेला कुठे पाणी मिळत नाही. झाडंसुध्दा सावलीला होतील अशी नाहीत. नेपती बोरीची बारीक सारीक झुडपं आहेत. दुपारच्या वेळी निघालं म्हणजे सगळया वाटेत माणूस क्वचितच दृष्टीस पडतं, एरवी शुकशुकाट भुतासारखं एकटयालाच जावं लागत.'' (माणदेशी माणसं पृ.४१)

तर माणदेशातील पूर्वीच्या वैभावातून साकारलेल्या परिसरावर माडगूळकर निवेदन करतात, 'चारपाचशे वस्तीचं खेडं पण त्यात देशमुख, देशपांडे यांचा वा गायकवाड, धायगुडयांचा असा एखादा वाडा असतो की वेळी प्रसंगी सा-या गावक-यांनी त्याच्यात खुशाल आश्रय ध्यावा. ओबड-धोबड बांधणीचे हे वाडे अद्याप तग धरून ऊभे आहेत. त्यांचा काळ संपला आहे'.(माणदेशी माणसं पृ.५०)

तर ‘गावाकडच्या गोष्टी’ या कथासंग्रहातही माडगूळकर परिसर चित्रणचे निवेदन करताना गांधीवधाची झळ येथील परिसराला कशा प्रकारे लागली आहे, आणि यातून तो परिसर कशा प्रकारे सावरला आहे यावर माडगूळकर निवेदन करतात, ‘वाडवडिलांनी बांधलेले कडीपाट वाडे नाहीसे झाले. ब्राम्हणांची कुटुंब उघडयावर पडली मग कुणी त्या जळत्या घरातच पत्र्याचा आडुसा करून राहू लागले. कुणी धर्मशाळेत तर कुणी देवळात बि-हाड टाकली. ब्राम्हाणांची अशी दशादशा झाली. तेव्हा लोक म्हणाले ‘बामणाची घरं उठली आता असल्या दिवसात पुन्हा पहिल्यासारख्या इमारती उभारण हयांचा देवाच्यान होणार नाही, लोकांच हे बोलणं ब्राम्हणांनी ऐकलं आणि ते ईर्ष्येला पेटले, आणि पूर्वीपेक्षा चौपट वाडे धरले, लोक म्हणू लागले ‘बामनाची जात निवडुंगासारखी माळावर टाकलं तरी उगवायची’. (गावाकडच्या गोष्टी पृ.३०) अशा प्रकारे माडगूळकरांनी आपल्या कथातून परिसर चित्रणावर प्रत्ययकारीरीत्या चित्रण केले आहे.

## माडगूळकरांच्या निवेदनातील सूक्ष्म सामाजिक चित्रणः

व्यंकटेश माडगूळकरांनी ‘बनगरवाडी’ , ‘माणदेशी माणसें’, ‘गावाकडच्या गोष्टी’ मधून माणदेशातील सामाजिक जीवनाचे बारकावे आपल्या निवेदनशैलीद्वारे टिपले आहेत. माडगूळकरांचे निवेदन समाजाचे सूक्ष्म निरीक्षण प्रकट करते. ‘बनगरवाडी’ या कादंबरीत माडगूळकरांनी धनगरांच्या समाजजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून निवेदन केले आहे. ते असे ‘रंगाने काळेभोर असलेले हे धनगर सदोदीत उघडे वावरत बाहेरच्या जगाविषयी त्यांना ज्ञान नव्हते, ते नव्हते याची जाणीवही नव्हती. भल्या सकाळी उठून रात्रभर वाडयात

कोंडलेली मेंढरे घेऊन ते वाडीबाहेर पडत, माळावरचा चगळचोथा टिपत टिपत गावाशेजारी यायला संध्याकाळी होई. गाव जवळ आले एक एक मेंढका बाजूला उभा राही आणि आपआपली मेंढरे बोलावून घेई रानातून आलेल्या मेंढयांचा एकच गोंधळ होई, मेंढया आणि पोरांना आणि पोर आईला बोलावत राही. बें-बें, में-मेंचा एकच गोंधळ होई. या मेंढराच्या गोंधळात शिरून मेंढक्याला मेंढरे जुळवावी लागत. हया गंगीचे हे लाव्हार, हया भुरीची ही काळी पोरे, असे करून जुळवावे लागे, पोरे लुचताना होणारा मचमच आवाज तेवढा ऐकू येई. पोरांची धुळींनी मळलेली अंगे मोठया मेंढया चाटत आणि पांढ-या घट्ट दुधाने पोरांची तोंडे माखून जात.

पहाटे मेंढरे जागी होऊन धडपडत खळाखळा मुतत, लेंडया टाकत. भल्या सकाळी मेंढका जागा होई. हाती खराटा घेऊन मेंढका वाडगा स्वच्छ झाडून काढी. हे होईतो पोरांची पोटे दुधाने भरलेली असत उडया मारत ते लोकरीचे गोळे इकडे तिकडे करीत असत. धनगरणीने केलेली ऊनऊन भाकरी शेरडाच्या दुधात मुरगाळून मेंढका सकाळची न्याहारी करी, दुपारच्या जेवणासाठी दोनचार मिरचू बांधून घेई आणि घोंगडे-काठी घेऊन मेंढरांना इशारा करी'.(पृ.२०ते२३)

तर धनगरांच्या जीवनात मृगाच्या पावसामूळे झालेल्या धावपळीवर प्रत्ययकारीरीतीने सुक्ष्मनिवेदन करतात, 'मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोडपत राहिला. धनगरांची धावाधाव झाली, वाडयात भिजणारी मेंढरे काढून झोपडयात आणली. भिजल्या लोकरीच्या वासाने धनगरांची घरे दरवळली. काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखलू लागली. गळणा-या जागी लहान मोठी भांडी ठेऊन दिली. मेंढराच्या

धडपडीतूनही भरलेल्या भांडयात ठिबकणा-या पाण्याचा आवाज कान किटवू लागला.'(पृ.३५)

माडगूळकर धनगर समाजाच्या संस्कृतिक जीवनाचे चित्रण करताना पुढीलप्रमाणे निवेदन करतात, 'राजा गावात येताच गावच्या पाटलाने नारळ आणि रुपाया घेऊन त्यांना सामोरे जायचे असा रिवाज होता. वाडीला पाटील नव्हता. तेव्हा सरकारी स्वारी येणार म्हणून शेजारच्या गावचा पाटील लुडबुडू लागला. त्याला गप्प केले आणि कोरा गोल अंगरखा घातलेल्या आमच्या कारभा-याने नारळ दयावा असे ठरवून टाकले. वेशीशी आरत्या घेऊन काही सुवासिनी उभ्या केल्या, नारळ-रुपाया असलेले ताट पुढे केले. राजाने त्याला हात लावला. पुढे आलेल्या सुवासिनींनी आरत्या ओवाळल्या'. (पृ.९१ ते ९४)

त्याच प्रमाणे माडगूळकर धनगरी समाजीवनात महत्त्वाचे स्थान असणा-या जत्रेचे चित्रण पुढीलप्रमाणे करतात, 'गावापासून एक मैलावर छोटेसे टेकाड होते. त्यावर रानात घालतात, तशी एक साधीसुधी खोप घातलेली होती. आणि त्या खोपेत मावल्याआई बसून राहिली होती. धनगरांच्या नवसाला पावणारी ही देवी इतके दिवस खोपीतच राहिली'. अशाप्रकारे माडगूळकर धनगरांच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिकतेचे चित्रण करतात.

माडगूळकरांनी 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातही सूक्ष्म सामाजिक जीवनावर प्रभावी व प्रत्ययकारी निवेदन केले आहे. माडगूळकरांनी या कथा संग्रहात माणदेशातील दलित पीडित दरिद्री समाजजीवनावर निवेदन केले आहे. 'माणदेशी माणसें' या कथा संग्रहातील 'धर्मा रामोशी' या कथेत दलित वर्गाची

दारिद्रयतेचे माडगूळकर निवेदन करतात, 'महार मांग नडलं अडलं म्हणजे घरी येतात आणि उगीच बसून राहातात, खोदून विचारल्यावर मग हालकेच बोलतात 'काय न्हाई जी कोरडयाला काय तरी दया म्हणूनच मागाव आलो होतो आक्काकडं' त्यांची अडचन ती केवढी? पण संकोचाने म्हणा किंवा देतील की न्हाई या भीतीने म्हणा ते कधी आल्यासरसे पटकन बोलून नाही दाखवायचे'.(पृ.८)

तर बाबाखान दरवेशी या कथेत बाबाखान या व्यक्तींच्या स्वभावाची जडणघडण, त्याच्या सामाजिक परिस्थितीतून कशी घडली आहे यावर माडगूळकर सूक्ष्म निरीक्षण नोंदवतात 'काळोख्या रात्री पाचपंचवीस माणसं गोळा झाली कारण मध्यानरात्र टळून गेल्यावर एकाएकी कालवा ऐकू आला. दरवेश्याच्या बायकोनं गहीवर मांडला होता. चिल्ली पिल्ली साथ करीत होती. त्या गोंधळाने आसपासचे शेजारी पाजारी आणि राखणीचे रामोशी धावून आले. दरवेश्याच्या छप्परापुढे गर्दी झाली. जो तो दुस-याला पुसू लागला. कोणापाशी दिवा काही नाही. दरवेश्याने आतून कवाड जाम लावून घेतलेले आणि रडण्याचा कल्लोळ चाललेला.'(पृ.१०७)

अशाच प्रकारे माडगूळकर 'गावाकडच्या गोष्टी' या कथा संग्रहातही अनेक कथातून सूक्ष्म सामाजिकतेचे चित्रण करतात. 'भुताचा पदर' या कथेत गरीब ब्राम्हण कुटुंबातील जीवनावर माडगूळकर निवेदन करतात, 'कुलकर्ण्याची पाळी यायच्या अगोदर नाना बामण फार गरीब माणूस होता. इतका गरीब की त्याच्या बायकोच्या अंगावर धड सुडके नसे, पोरबाळं कुत्र्याच्या पिलासारखी गावभर हिंडत दोन दोन दिवस घरी चूलं पेटत नसे. मग ती माऊली चोरून घरे हिंडे, आडोशाला बसून त्या पोरांना जेवू घालत, कारण

इतर भाऊबंधाना कळले तर ते नावं ठेवतील, नानाच्या बायकोन पोरं आपल्या हातानं बाटवली म्हणतील म्हणून असा एकंदर त्यांचा संसार होता. अठराविश्व दारिद्रय असलेला लाचारीचा नाचार''.(पृ.७९)

त्याचप्रमाणे माडगूळकर 'काय सुध्दीक गेलं न्हाई' या कथेत सूक्ष्म सामाजिक जीवनावरती निवेदन करतात. 'आमावश्याची काळी रात्र चांगली रंगली गडद झाली. अंधाराची जाड घोंगडी पांघरून बाबालालच घर झोपलं, आता कुणालाच जाग नव्हती खुराडयात पंख पांघरून कोंबडया झोपल्या होत्या. दावणीला शेणानं मळलेल्या चिपाडावर रेलून म्हैस झोपली होती. भिंतीच्या कडेला चोपलेलं कुत्र अंगाचं वेटोळ करून झोपलं होतं आणि सुस्तावलेली मांजरे ही चुलवणाशी बसल्या बसल्याच पेंगली होती'.

अशा प्रकारे माडगूळकरांनी आपल्या कादंबरी व कथासंग्रहातून माणदेशातील सामाजिक जीवनाचे बारकावे अतिशय सूक्ष्मतेने आपल्या निवेदनशैलीद्वारे टिपले आहेत. माडगूळकरांच्या निवेदनाविषयी सुधा जोशी म्हणतात, ''सामाजिक वास्तवाचे मर्मग्राही चित्रण करणा-या अशा कथातून निवेदकाला आणि त्यामागील गर्भित लेखकाला असलेले सामाजिक अन्यायाचे, भीषण विषमतेचे भान ध्वनित होते'.[७]

## माडगूळकरांच्या निवेदनातील व्यक्तिचित्रणः

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथात्मक साहित्यातून एकूणच मराठी साहित्यविश्वाला माणदेशातील विविध वृत्ती-प्रवृत्तींच्या व्यक्तींचे मर्मग्राही दर्शन घडविले आहे. या व्यक्तिचित्रणाला वाचकापर्यंत पोहचविण्यास त्यांची निवेदनशैली प्रमुख आधार ठरली असे म्हणता येईल.

माडगूळकरांनी अनेकविध व्यक्तिचित्रे त्यांच्या बारकाव्यानिशी बनगरवाडी कादंबरीतून साकारली आहेत व या व्यक्तिरेखा आपल्या खास अशा निवेदनशैलीने प्रभावित केल्या आहेत. 'बनगरवाडी' या खेडयातील सर्वांच्याच आदराची जिव्हाळयाची मनमिळावू अशी व्यक्तिरेखा म्हणजे म्हातारा कारभारी. या कारभा-याचे माडगूळकर निवेदनतून चित्रण करतात, 'मिश्या पांढ-या झालेला एक म्हातारा हातातली काठी टेकत रानातून आला. त्याच्या भुवयासुध्दा पांढ-या झालेल्या होत्या. खांदयावरचे जाडजूड कांबळे, त्याने रूप्याचे कडे असलेल्या हातानी बळकट धरले होते. कपाळावर हात घेऊन त्याने मला न्याहाळले, 'खाणाखुणा पटण्यासाठी चुकले मेंढरू न्याहाळावे तसे न्याहाळले. ज्या मातीत तो दिवसभर मेंढरामागे हिंडला त्या मातीचा रंग त्याच्या देहाला लाभला'.(पृ.८) माडगूळकर व्यक्तिरेखेबरोबरच त्या परिसरात त्याच्या शरीराची असलेली ठेवण आपल्या निवेदनाद्वारे प्रभावीरीत्या टिपतात.

पुढे माडगूळकर खलप्रवृत्तीचा नसणारा परंतु आपला दबदबा गावावर राहावा म्हणून तसे वागणारा 'दादू बालटया' आपल्या निवेदनशैलीद्वारे प्रभावीपणे रेखाटतात. या व्यक्तिरेखे संदर्भात माडगूळकर पुढील प्रमाणे निवेदन करतात, 'डोक्याला तांबडया रंगाचा पटका, अंगात गोल सदरा, धोतराच्या टोका बरोबरच एक भालाही त्याने हातात धरला होता. त्याने तांबरल्या डोळयाने पाहून मिशावरून बोटे फिरवून थूंक टाकली दम देताना आवाज काढावा तसा आवाज काढून त्याने विचारले 'काय अंडिवाला हायस का गा?'

व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसें' हा व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रह लिहून माणदेशातील अनेकविध जातिजमातीतील व्यक्तिरेखा

प्रभावीपणे आपल्या निवेदनशैलीद्वारे रेखाटल्या आहेत. कोंडिबा गायकवाड या स्वभावाने आडदांड व शरीराने पिळदार असलेल्या व्यक्तिरेखेवर माडगूळकर निवेदन करतात, 'तो आपल्या घराच्या जोत्यावर बसून तुटलेला आसड नीट करीत होता. उघडाच आपली काळी कातडी उन्हात तापवीत बसला होता. एखादया माजलेल्या रेडयासारखा, सांध्यात गाठाळलेल्या जाड बोटांनी आसड निट करताना त्याच्या दंडावरच्या बेडक्या मागपुढ हालत होत्या''.

तर 'रघू कारकून' या कथेत गरिबीच्या विळख्यात सापडलेल्या रघू कारकूनाच्या बायकोचे माडगूळकर निवेदन करतात, 'फाटक्या संसाराला ठिगळं लावता लावता बापाघरी कमविलेले सारे मांस जाऊन हाडे आणि कातडी राहिली अंगावर फूटका मणी नाही. नेसायला धड सुडकं नाही. पोरा बाळांच्या खस्ता खाताखाता गरिबीशी झगडता झगडता ती पार झिजून, गेली खचून, ती रडायची, ओरडायची. रोज आपल्या नशिबाच्या आणि रघूच्या नावानं बोटं मोडायची'.(पृ.१०१) माडगूळकरांनी त्यांच्या कथालेखनाचे नंदनवन असणा-या माणदेशातच आपल्या कथा लेखनाची जडणघडण झाली. हे सांगत असताना माडगूळकर म्हणतात, 'किन्हयीचे किर्तनकार, राखणदार, बळी, रामोशी, दादा, आई, रामा आणि बरोबरची पोरे या सर्वांनी गोष्ट कशी सांगावी हे मला सांगितले''.[८]

व्यंकटेश माडगूळकरांनी 'गावाकडच्या गोष्टी' या कथा संग्रहातूनही अनेकविध व्यक्तिरेखाचे प्रभावी निवेदन केलेले आहे. या कथा संग्रहातील 'झोंबी' या कथेतील बेरकी, मग्रूर स्वभावाच्या बाबू म्हात-याचे माडगूळकर प्रत्ययकारी वर्णन करतात, 'वयानं थकलेला हा माणूस अंगापिंडानं बैलासारखा बांधला गेला होता. त्यांच डोक, तोंड

शरीराच्या मानान लहान होत आणि मांडीखाली पाय बारीक होते. त्यांच वागणं वरून दिसायला शाळा मास्तरासारखं मवाळ नम्रतेचे असे पण ते सगळ खोटं, बिघडला म्हणजे तो भारी उर्मट आणि लागीट बोले'.(पृ.३६)

तर याच कथा संग्रहातील 'ऑडिट' या कथेतील गोपा व्हरल या गरीब माजोरी स्वभावाच्या व्यक्तीचे माडगूळकर 'गोपा रंगानं करवंदासारखा काळा होता. त्याचं नाक नकटं होतं, गालाची हाडं वर आली होती. डोळे बारीक आणि मिचमिचे होते. इतर व्हरलप्रमाणे गोपाही दरिद्री होता. असा गरीब गोपा अलीकडे थोडा गबर झाला होता. दहापाच रुपयांना विकत घेतलेली त्याची पाट व्याली होती. त्या जोरावर गोपा तालेवाराच्या तो-याने वागत होता'. असे माडगूळकर निवेदन करतात.

अशाप्रकारे माडगूळकर आपल्या कथात्मक साहित्यात व्यक्तिचित्रणावरती प्रत्ययकारी व प्रभावी निवेदन करून माणदेशातील अनेकविध व्यक्तिरेखांचे प्रभावी दर्शन घडवितात. त्यांच्या अशा या निवेदन शैलीवर भाष्य करताना म.दा.हातकणंगलेकर म्हणतात, 'त्यांचे निवेदन कधी भावविवश होत नाही. एवढेच नव्हे तर ते भावनाप्रधानपणेही केलेले नसते, माडगूळकरांनी ज्या काळात कथा लिहायला प्रारंभ केला त्या काळातील कथात्मक साहित्यात त्यांच्या निवेदनातील भावना प्रकटीकरणावरील नियंत्रण, एकदंरीत निवेदनशैलीतील अपूर्व म्हणावे लागेल''.[९] माडगूळकरांनी स्वतःला दिसलेल्या व्यक्तिरेखा जशास तशा आपल्या निवेदनशैलीद्वारे अविष्कृत केल्या आहेत.

## व्यंकटेश माडगूळकरांच्या निवेदनशैलीतील प्रसंग चित्रणः

व्यंकटेश माडगूळकरांनी 'बनगरवाडी', 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कादंबरी व कथासंग्रहातून अनेकविध प्रसंगाचे प्रभावी निवेदन केले आहे. आपल्या निवेदनशैलीच्या कौशल्याने माडगूळकरांनी अनेक प्रसंगांना साक्षात उभे केले आहे. माडगूळकरांनी 'बनगरवाडी' या कादंबरीत तालमीच्या उद्‌घाटन प्रसंगाचे चित्रण पुढीलप्रमाणे केले आहे, 'दुसरे दिवशी सकाळी साडेआठ वाजता उद्‌घाटन समारंभ होता आणि अद्याप तालमीवर पेंड टाकला नव्हता. त्यामुळे धावाधाव झाली. कामधाम सोडून सारी वाडी एकत्र आली, चिखल झाला, चिखला पासून तालमीच्या धाब्या प्रर्यंत शे-पाऊनशे माणूस उभे राहिले आणि पेंड टाकण्याचे काम सुरू झाले. पेंड टाकून पूरा झाला आणि टळटळीत उजाडले. सरकार आले म्हणून धावा धाव झाली. पोरे काखेला मारून धनगरणी वेशीकडे धावू लागल्या. तीसपस्तीस धनगरांची खोपटे असलेल्या या गावात राजा आला. तालमीचे बंद दार राजाने आपल्या हाताने उघडले. पुन्हा शिंगे वाजली.

तर 'बनगरवाडी'तील मावल्या आईच्या जत्रेतील प्रसंगाचे माडगूळकर निवेदन असे करतात, 'व्हरलाने डफडे वाजवले, पिंपाण्या फुंकल्या आणि धुळा धनगराच्या अंगात आले हा-हू करून तो धुमू लागला, शरीराला आळोके-पिळोके देऊ लागला. त्याने अंगावरचे घोंगडे टाकून दिले डोईचा पटका टाकून दिला. उघडाबंब असा धुळा धनगर उभा राहिला आणि घमू लागला.

तसेच जगण्या रामोश्याने वांगी गावची बाई पळवून नेल्यावर बनगरवाडीतील रामोश्यावर ओढावलेल्या प्रसंगाचे माडगूळकर सूक्ष्म

चित्रण करतात. 'बनगरवाडी' पासून पाचसहा कोस वांगी गाव होते. सा-या तालुक्यात हे गाव आरगट म्हणून प्रसिध्द होते. एके दिवशी दोन प्रहरी आठ-दहा जवान लोक वाडीत घुसले. हातात कु-हाडी, भाले होते. भराभर रामोशांची खोपटे तपासली. एका दोघा रामोशांना कु-हाडीच्या तुंब्याने हाणले रामोशांच्या भ्यालेल्या बायका-पोरे उचलून धनगरांच्या आश्रयाला आल्या'.(पृ.९८) माडगूळकरांच्या निवेदनाविषयी गो.मा.पवार म्हणतात, 'त्यांच्या निवेदनशैलीचा एक विशेष म्हणजे ते समूहमनाचा प्रत्यय देतात. ग्रामीण मन कसे आहे, याचा व्यक्तिगत निवेदक म्हणून आपल्याला ते फारसे जाणवतच नाहीत, जणू काही या गावाच सामूहिक मनच त्यांच्यातून प्रकट होते'.[१०]

व्यंकटेश माडगूळकरांनी 'माणदेशी माणसें' व 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातही अनेकविध प्रसंग आपल्या निवेदनशैलीद्वारे उभे केले आहेत. 'माणदेशी माणसें' या कथासंग्रहातील शिदा चांभार या कथेत गांधीवधानंतरच्या प्रसंगावर माडगूळकर निवेदन करतात. 'गांधीवधानंतर गावात जो गोंधळ झाला, जाळपोळ झाली, तेव्हा महारा पोरांनी जळत्या घरातील मालमत्ता लुटली. त्यात शिदा आघाडीवर होता. रोज ज्यांच्याशी संबंध यायचा त्या ब्राम्हणांच्या घरातील भांडीकुंडी, धान्यधुन्य त्यानं त्या धबडग्यात पळवलं. स्वतःला जाईना तेव्हा बायकोला आणि पोराला हाक मारली आणि पळवलं'.(पृ.७३)

तसेच बिटा काका या कथेत बिटा काकावर चहूबाजूंनी ओढावलेल्या दुःखी प्रसंगाचे माडगूळकर निवेदन करतात. 'अगोदरच जेरीला आलेले काका या तडाख्याने फारच खाली आले. बघताच पोटात कालवावे असे दिसू लागले. त्यांचे ते हसणे, तो चेष्टेखोरपणा

कुठल्या कुठे नाहिसा झाला. संस्थाने विलीन झाली. नोकरी गेली'. (पृ.१४६)

अशाच प्रकारे माडगूळकरांनी 'गावाकडच्या गोष्टी' या कथा संग्रहातही अनेक कथातून आपल्या निवेदन शैलीद्वारे अनेकविध प्रसंग चितारले आहेत. या कथासंग्रहातील 'झोंबी' या कथेतील कुस्तीच्या प्रसंगाचे माडगूळकर अतिशय कौशल्यपूर्णतेने निवेदन करतात. 'सलामी झाली आणि सटकयासरशी पाहुणा बंडाच्या पाठीशी आला. मुरगाळा मारून त्याने बंडाला खाली गुडघ्यावर आणला, जमिनीबरोबर चेपला, वाळूचे जाडे खडे बोचून त्याच्या गुडघ्याची साल निघाली तरी तो नेटाने उठून गुडघ्यावर आला पाठीवर ज्वारीच्या पोत्यासारख्या बसलेल्या लासगावच्या पाहुण्याला फेकण्यासाठी धडपडू लागला. पण त्यानं वाळूत टेकलेल्या बंडाच्या हाताला खुब्यापाशी दणका दिला आणि काय कळायच्या आतच बंडाची पाठ लागली'. (पृ.३८)

तसेच याच कथा संग्रहातील 'ऑडिट' या कथेत व्हरल जमातीवर गावच्या पाटलांनी व गावक-यांनी केलेला हल्ला या प्रसंगाचे माडगूळकर निवेदन करतात. 'अंधारातच मंडळी धडाधड उठली आणि भिंतीशी बसलेल्या मूठभर व्हलरांशी भिडली, फडाफड जोडे बसू लागले. पाठीत, डोक्यात, तोंडावर, गावकरी पिसाळले धर व्हरल उचल कमरेइतके आणि आपट खाली, घाल लाथा-बुक्क्या असा धोशा त्यांनी चालवला. कुणी गावक-याचे पाय धरले कुणी जागच्या जागी विव्हळत पडले. असा सगळा प्रकार घडला, त्यातच रात्र निघून गेली'.(पृ.१४८)

अशा प्रकारे माडगूळकरांनी आपल्या कथात्मक साहित्यातून अनेकविध प्रसंग आपल्या निवेदनाद्वारे प्रत्ययकारीरीतीने उभे केले

आहेत. त्यांच्या या प्रसंगाचित्रण निवेदना विषयी वासुदेव मुलाटे म्हणतात, 'माडगूळकरांनी आपल्या कथानकाला विविध घटना प्रसंगाद्वारे प्रभावीपणे साकार केले आहे. या घटना व प्रसंगाचे वर्णन वाचल्यानंतर माडगूळकरांच्या निवेदनशैली सामर्थ्याची जाणीव झाल्यावाचून राहात नाही. माडगूळकरांची शैली नेमकया, नेटक्या वर्णनातून, कृतीच्या तपशिलातून, ग्रामीण शब्दांच्या वाक्प्रचार म्हणीच्या वापरातून, आकारत जाते. नाटयात्मकता हाही त्यांच्या शैलीचाच एक विषय आहे'.(पृ.११)

## समारोपः

व्यंकटेश माडगूळकरांनी प्रादेशिक कथा व कादंबरीची एक वेगळी वहिवाट निर्माण केली व आपल्या प्रतिभाशक्तीच्या साहाय्याने कथा आणि कादंबरीची ही वहिवाट रूळविलीही. माडगूळकरांनी आपले नंदनवन असणा-या माणदेशाला आपल्या निवेदनशैलीने कथा आणि कादंबरीतून जीवंतपणे साकारले. त्यांनी आपल्या निवेदनातून उभ्या केलेल्या माणदेशाच्या चित्रणविषयी बापट व गोडबोले म्हणतात, ''माण, नदीच्या परिसरातील आटपाडी हा दुष्काळी तालुका त्यांच्या मनात कायम घर करून बसलेला आहे. याच पार्श्वभूमीवर, त्याच सामाजिक वातावरणात तेथील लोक भाषेच्या प्रवाहात ते डुंबत असतात. माडगूळकरांचे विश्व मर्यादित असेल पण स्वयंपूर्ण अनुभूतीला त्याचीच अवश्यकता आहे''.[१२] या स्वयंपूर्ण अनुभूतीच्या आविष्काराचे ओझे पेलण्यास माडगूळकरांची शैली समर्थपणे कशी उभी राहिली हे माडगूळकरांच्या वरील निवेदनशैली विचारावरून स्पष्ट होते.

## संदर्भ


१) पवार गो.मा. :'साहित्यमूल्य आणि अभिरुची'
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
प्र.आ. १९९४ पृष्ठ-१९४

२) बापट प्र.वा. गोडबोले ना.वा. :'मराठी कादंबरीः तंत्र आणि विकास'
व्हिनस प्रकाशन, पुणे.
द्वि.आ. डिसें १९५७ पृष्ठ ५४

३) बालशंकर-देशपांडे :'कादंबरीः विवेचन आणि विश्लेषण'
स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.
प्र.आ.१९९८ पृष्ठ-४४

४) चवरे रा.गो. :'मराठी कथाः प्रवृत्ती आणि प्रवाह'
मराठी साहित्य परिषद, अमरावती.
प्र.आ. १९९५

५) हातकणंगलेकर म.द. :'माणदेशी माणूस आणि कलावंत'
शब्द प्रकाशन, सातारा.
प्र.आ. मे २००० पृष्ठ-३३

६) माडगूळकर व्यंकटेश :'गावाकडच्या गोष्टी'
माझ्या लिखानाची कळसूत्रे.
सातवी आ. २००१ पृष्ठ-९

७) जोशी सुधा :'कथाः संकल्पना आणि समीक्षा'
मौज प्रकाशन, मुंबई.
प्र.आ. फेब्रु-२००० पृष्ठ-१०१

८) माडगूळकर व्यंकटेश :'हस्ताचा पाऊस' - सुरवातीच्या आठवणी
उत्कर्ष प्रकाशन, पुणे.
प्र.आ. १९६५ पृष्ठ-११,

९) हातकणंगलेकर म.द. :'पूर्वोक्त' पृष्ठ-२२

१०) पवार गो.मा. :'ओझं'
साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
प्र.आ. जून १९८७ पृष्ठ-३१,

११) मुलाटे वासुदेव :'ग्रामीण कथाः स्वरूप आणि विकास
स्वरूपा प्रकाशन, औरंगाबाद.
द्वितीयवृत्ती ऑग-२००५ पृष्ठ-२९६

१२) बापट-गोडबोले :'पूर्वोक्त'. पृष्ठ-२२५